Agrowon, 30/06/2026

# अमेरिकेला भारतीय आंब्यांची गोडी

## वॉशिंग्टनमधील 'मँगो फेस्टिव्हल'ला हजारोंची गर्दी

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :** अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमधील ड्युपाँट सर्कल येथे आयोजित 'टेस्ट द ट्रॉपिकल मॅजिक' या वार्षिक आंबा महोत्सवाला हजारो नागरिकांनी भारतीय आंब्यांचा स्वाद अनुभवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. येथील भारतीय दूतावासाच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यक्रमात केसर, लंगडा, मालदा आदी भारतीय आंब्यांच्या विविध जातींची चव रसिकांनी घेतली.

यंदाच्या महोत्सवासाठी ८ हजारांहून अधिक नागरिकांनी नोंदणी केली होती. कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेल्या पाच केंद्रांवर नागरिकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. गेल्या वर्षी एका केंद्रच उभारण्यात आले होते. त्याला मोठा प्रतिसाद मिळाल्याने यंदा कार्यक्रमाचा विस्तार करण्यात आला.

भारतीय वंशाच्या अमेरिकन नागरिकांसह स्थानिक नागरिकांनीही भारतीय आंब्यांचे कौतुक केले. भारतीय वंशाच्या दिशा यांनी लहानपणी भारतात व्यतित केलेल्या उन्हाळी सुट्ट्यांत चाखलेल्या आंब्यांच्या आठवणींना



उजाळा मिळाल्याचे सांगितले. तर अमेरिकेत फुटबॉल विश्वचषक पाहण्यासाठी आलेल्या अँड्र्यू यांनी केसर आंबा हा आपण खाल्लेल्या सर्वांत चविष्ट आंब्यांपैकी असल्याचे म्हटले.

भारतीय राजदूत विनय मोहन क्वात्रा यांनी हा कार्यक्रम केवळ भारतीय आंब्यांचा नव्हे, तर भारतीय खाद्यसंस्कृतीचा उत्सव असल्याचे सांगितले. त्याला मिळालेला प्रतिसाद पाहता अशा खाद्यप्रसार उपक्रमांचे आयोजन अधिक वारंवार करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'काय बी एक्स्पोर्ट्स'चे मुख्य कार्यकारी अधिकारी कौशल खाकर यांनी भारतीय आंबे अमेरिकेत ताजे पोहोचावेत, यासाठी जलद पुरवठा साखळी उभारण्यात यश आल्याचे सांगितले.

### आंब्यांची निर्यात सातत्याने वाढती : देव

दरम्यान, कृषी व प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाचे (अपेडा) अध्यक्ष अभिषेक देव यांनी अमेरिकेला भारतीय आंब्यांची निर्यात सातत्याने वाढत असल्याचे सांगितले. गेल्या वर्षी अमेरिकेला २,३०० टन आंब्यांची निर्यात झाली होती. यंदा हा आकडा हंगाम संपण्यापूर्वीच ओलांडण्यात आला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. भारतीय आंब्यांना अमेरिकन बाजारपेठ २००६ मध्ये खुली झाली. आंब्यावरील 'मँगो सीड वीव्हिल' या किडीच्या धोक्यामुळे लागू असलेली आयातबंदी कमी मात्रेतील किरणोत्सर्ग प्रक्रियेनंतर हटविण्यात आली. त्यानंतर भारतीय आंब्यांची अमेरिकेतील मागणी सातत्याने वाढत आहे.

Agrowon, 22/06/2026

# जानेफळच्या हळदीचा पहिला कंटेनर दुबईला रवाना

## आंतरराष्ट्रीय झेप; 'स्मार्ट' अंतर्गत संपूर्ण मूल्यसाखळी विकसित

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

बुलडाणा : जिल्ह्यातील विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्यूसर कंपनी (जानेफळ, ता. मेहकर) आणि पी. वाय. एंटरप्रायझेस (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने जानेफळ परिसरातील हळदीचा पहिला कंटेनर दुबईसाठी रवाना करण्यात आला. या उपक्रमामुळे परिसरातील हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी जागतिक बाजारपेठेची दारे खुली झाली आहेत. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत हळद पिकाची मूल्यसाखळी विकसित करून शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

या निर्यात उपक्रमाचा प्रारंभ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, तंत्र अधिकारी व्ही. पी. सरोदे आणि तालुका कृषी अधिकारी के. एस. काळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्यूसर कंपनीने हळद या मोठी बाजारपेठ असलेल्या नगदी पिकाची संपूर्ण मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी २२ जानेवारी २०२४ रोजी हळद प्रक्रिया प्रकल्पाची पायाभरणी केली होती. मार्च २०२६ मध्ये हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला आहे.



**बुलडाणा : जानेफळच्या विदर्भ कृषी समृद्धी शेतकरी कंपनीच्या पुढाकाराने हळदीचा पहिला कंटेनर विदेशात रवाना झाला. या कंटेनरला जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी संतोष डाबरे व इतर मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवली.**

या प्रकल्पामुळे परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या हळदीसाठी हक्काची आणि विश्वासार्ह बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. स्थानिक पातळीवर प्रक्रिया आणि निर्यातीची सुविधा निर्माण झाल्याने वाहतूक खर्चात बचत होणार असून, शेतकऱ्यांना उत्पादनाला अधिक मूल्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या वेळी मंडळ कृषी अधिकारी एस. एन. अंभोरे, उपविभागीय कृषी अधिकारी गजानन बोडखे, व्ही. बी. सिरसाट, के. एस. धोंडगे, डी. बी. लाड, पी. एस. अंभोरे, सहायक कृषी अधिकारी मनीषा काळे, समूह सहायक दत्ता कृपाळ यांच्यासह विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्यूसर कंपनीचे अध्यक्ष संतोष साखरे, उपाध्यक्ष मोहन प्रल्हाद धोटे, सचिव अमोल माडोकर, कार्यकारी संचालक मोहन पाटील धोटे, संचालक गजानन काळे, विशाल धोटे, विलास धोटे तसेच कंपनीचे कर्मचारी संदीप मिटकरी, गणेश चांदणे, रवींद्र डोंगरे, सुनील खुरद, सागर लाड, गजानन साखरे, पीयूष छापरवाल आदी उपस्थित होते.

अमरावती विभागीय अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत नाईक आणि बुलडाणा जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी दीपक बुटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आत

Agrowon, 20/06/2026

# ‘रुक्मिणी महासंघा’चा २९ टन कांदा श्रीलंकेला

अॅग्रोवन वृत्तसेवा

सोलापूर : येथील रुक्मिणी महिला शेतकरी महासंघ प्रोड्यूसर कंपनीने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला तब्बल २९.७ टन कांदा थेट श्रीलंकेला निर्यात केला आहे. १ हजार १४१ कांद्याच्या बॅग्ज असलेला हा कंटेनर उरण येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट येथून श्रीलंकेसाठी रवाना झाला आहे.

या थेट आंतरराष्ट्रीय व्यवहारामुळे बाजारपेठेतील मध्यस्थांची (दलालांची) साखळी मोडीत निघाली आहे. याचा थेट फायदा शेतकऱ्यांना झाला असून त्यांच्या मालाला चांगला भाव मिळाला आहे. या निर्यातीमुळे शेतकऱ्यांना प्रति किलो किमान १ रुपया अतिरिक्त नफा मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (उमेद) मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश सागर यांच्या हस्ते आणि सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत कांद्याच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

या प्रसंगी उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, रुक्मिणी महिला शेतकरी महासंघाच्या अध्यक्षा सुनीता गोसावी, संतोष डोंबे, संचालिका अर्चना कदम, चंद्रवीर (प्रतिनिधी, टेक्नो सर्व संस्था) उपस्थित होते.

या कांद्याची निर्यात करताना जागतिक दर्जाचे पॅकिंग करणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे आणि निर्यातीची सर्व तांत्रिक प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी ‘टेक्नो सर्व’ या संस्थेचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. सोलापूर जिल्ह्यातून पहिल्यांदाच हा प्रयोग करण्यात आला.



**सोलापूर : येथील रुक्मिणी महिला शेतकरी महासंघ प्रोड्यूसर कंपनीने २९.७ टन कांदा उरण येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट येथून श्रीलंकेसाठी रवाना करण्यात आला. यावेळी उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश सागर, चंद्रशेखर जगताप, सचिन चवरे, सुनीता गोसावी उपस्थित होते.**

> ‘उमेद’चा सोलापूर कक्ष आणि ‘टेक्नो सर्व’ संस्थेने यात मोलाची कामगिरी केली आहे. ग्रामीण महिलांना योग्य मार्गदर्शन आणि हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून दिली, तर त्या मोठी क्रांती घडवू शकतात.
>
> - नीलेश सागर, मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद

# काढणीपश्चात सुविधायुक्त क्लस्टर्स उभारणार

## 'मॅग्नेट-२.०' अंतर्गत प्रकल्प; आंतरराष्ट्रीय कृषी बाजाराला चालना

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : मॅग्नेट-२.० (महाराष्ट्र अॅग्रिबिझनेस नेटवर्क) प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच काढणीपश्चात सुविधांनी सुसज्ज मेगा क्लस्टर्स उभारण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मॅग्नेट-२.० प्रकल्पासाठी मॅपिंग स्टडी आणि संपूर्ण प्रकल्प आराखडा अंतिम करण्यासंदर्भात नुकतीच रावल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहसचिव विजय लहाने, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, तसेच सल्लागार आणि अधिकारी उपस्थित होते.

रावल म्हणाले, की आशियायी विकास बँकेच्या (एडीबी) शिफारशींनुसार मॅग्नेट प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे. मॅग्नेट-२.० साठी २,४०२ कोटी रुपये (सुमारे २५० दशलक्ष अमेरिकन डॉलर) निधीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळाने या निधीस मान्यता दिली असून प्रकल्पाला निती आयोगाचीही मंजुरी मिळाली आहे. सध्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाकडे प्राथमिक प्रकल्प अहवाल अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

### २३ उच्च मूल्य पिकांचा समावेश

प्रकल्पांतर्गत राज्यातील २३ उच्च मूल्य पिकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये केळी, डाळिंब, आंबा, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, सीताफळ, चिकू, स्ट्रॉबेरी, काजू, मिरची, भेंडी, पडवळ, द्राक्षे, पपई, फणस, अंजीर, हळद, आले, शेवगा, टोमॅटो आणि फुलशेती यांचा समावेश आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई परिसरात नव्या आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उभारणीला गती मिळणार आहे. शेतीमाल मूल्यसाखळी बळकट करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ) आणि व्हॅल्यू चेन ऑपरेटर्सची क्षमता वाढविणे, काढणीपश्चात व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रकल्पांतर्गत नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, काढणीपश्चात पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठ्यासाठी 'फायनान्शियल इंटरमीडियरी लोन'द्वारे सुमारे ४०० उपप्रकल्पांना अर्थसाह्य केले जाणार असल्याची माहितीही रावल यांनी दिली.

कृषी उत्पादनांसाठी ट्रेसेबिलिटी यंत्रणा विकसित करणे, गुणवत्ता मानकांची पूर्तता करणे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा एकमेकांना जोडणारी प्रभावी व्यवस्था निर्माण करणे आणि काढणीपश्चात नुकसान कमी करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे. मागणीआधारित मूल्यसाखळी विकसित करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

Pudhari, 14/06/2026



# २,४०२ कोटींच्या निधी आराखड्यास मंजुरी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

आशियाई विकास बँकेच्या शिफारशींनुसार, मॅग्नेट प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत असून, मॅग्नेट-२.० साठी २ हजार ४०२ कोटी रुपये (सुमारे २५० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) निधीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळाने या अतिरिक्त निधीस मान्यता दिली असून, प्रकल्पाला नीती आयोगाची मंजुरी प्राप्त झाल्याची माहिती राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. सध्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाकडून प्राथमिक प्रकल्प अहवाल अंतिम मंजुरीच्या प्रक्रियेत आहे.

मॅग्नेट-२.० प्रकल्पातून मुंबई परिसरात नवीन आंतरराष्ट्रीयं कृषी उत्पन्न बाजार समिती उभारणीस बळ मिळणार आहे. मॅग्नेट-२.० प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. जागतिक बाजारपेठांमध्ये उपलब्ध असलेल्या आधुनिक सुविधा राज्यातील बाजार व्यवस्थेत निर्माण करण्यात येणार असून, महाराष्ट्रात काढणीपश्चात सुविधांनीयुक्त मेगा क्लस्टर्स विकसित करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट-२.०) प्रकल्पासाठी मॅपिंग स्टडी व संपूर्ण प्रकल्प आराखडा अंतिम करण्याबाबत पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत शुक्रवारी (दि. १२) बैठक झाली. या वेळी सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहसचिव विजय लहाने, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव तसेच प्रकल्पाचे सल्लागार व अधिकारी उपस्थित होते. या वेळी प्रकल्पाच्या विविध घटकांचा आढावा घेण्यात आला.

## मॅग्नेट प्रकल्पाचा उद्देश काय?

कृषी उत्पादनांसाठी ट्रेसेबिलिटी यंत्रणा विकसित करणे म्हणजे "शेतापासून ते ग्राहकांच्या ताटापर्यंत" प्रत्येक कृषी उत्पादनाचा मागोवा घेण्याची डिजिटल किंवा पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे होय. गुणवत्ता मानकांची पूर्तता करणे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी प्रभावी जोडणी निर्माण करणे, अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन देणे, हवामान प्रतिसादक्षमता वाढविणे, पिकांचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे आणि मागणीआधारित मूल्यसाखळी विकसित करून खासगी गुंतवणुकीला चालना देणे, ही मॅग्नेट-२.० प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

Agrowon, 10/06/2026

# कांदा समितीच्या अहवालासाठी उपसमिती

## पंधरा दिवसांत अहवाल देण्याचे आदेश; सचिवस्तरीय समितीला करणार साह्य

ॲग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील कांदा उत्पादकांच्या समस्यांवर नेमण्यात आलेल्या सचिवस्तरीय समितीचा अहवाल देण्यासाठी उपसमिती नेमण्याचा निर्णय पणन विभागाने घेतला आहे. या उपसमितीला अध्यक्ष नसून, पणन संचालक शरद जरे यांना सदस्य सचिव करण्यात आले आहेत. या उपसमितीची कार्यकक्षा भली मोठी असूनही १५ दिवसांत अहवाल देण्याचे बंधन घातले आहे.

राज्यात कांद्याचे दर घसरल्याने जुलै २०२५ मध्ये राज्य मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली जम्बो समिती नेमण्यात आली होती. या समितीने ४५ दिवसांत अहवाल देणे अपेक्षित होते. मात्र ११ महिने होऊनही या समितीने अहवाल सादर केलेला नाही. विशेष म्हणजे या समितीला मुदतवाढही देण्यात आलेली नाही. दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची सोय लावण्यासाठी शुद्धिपत्रक काढून १९ जणांच्या समितीत आणखी चार सदस्यांची वर्णी लावण्यात आली. या समितीने अहवाल देण्याआधी २५ मार्च २०२६ रोजी वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. यामध्ये सहकार विभागाचे प्रधान सचिव, कृषी विभागाचे सचिव, कृषी आयुक्त हे सदस्य आहेत. राज्य कृषी व पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सदस्य सचिव आहेत. या समितीने कांदा दर घसरणीची कारणमीमांसा, दर घसरणीबाबत तातडीची उपाययोजना, कांदा निर्यातीसाठी उपाययोजना, कांदा पिकाबाबत करावयाच्या दीर्घकालीन उपाययोजना सुचवायच्या होत्या.

### उपसमितीची कार्यकक्षा

कृषी विद्यापीठांनी तयार केलेला चांगल्या प्रतीचा कांदा, मूल्य साखळीत कसा आणता येईल याचा सविस्तर अहवाल देणे, कांदा दर घसरणीची कारणमीमांसा, कांदा दर घसरण, उच्च तापमानातील साठवणुकीचे तपशील, त्यापासून होणारे फायदे आणि खर्च रचना यांचा उत्पादन खर्चावरील परिणाम, कांद्यापासून उप-उत्पादनाबाबत अहवाल देणे, मागील सात ते आठ वर्षांतील कांदा निर्यातीबाबत केंद्र सरकारचे धोरण आणि दरावर झालेल्या परिणामांचा तपशील, राष्ट्रीय कांदा लसूण संशोधन केंद्राने विकसित केलेल्या कांदा साठवणूक केंद्राला भेट देऊन अहवाल देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या समितीने १५ दिवसांत अहवाल द्यावा, असेही शासन आदेशात म्हटले आहे.

या समितीला अहवाल देण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली नव्हती. तसेच अहवाल अंतिम मान्यतेपर्यंत द्यावा, अशी अट घातली होती. आता या समितीचा अहवाल सादर करण्यासाठी उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे.

या समितीत माजी कुलगुरू डॉ. किसनराव लवांडे, निवृत्त पणन संचालक सुनील पवार, इंडो व्हेजिटेबल डेव्हलपमेंट असोसिएशनचे सारंग निर्मल, आठवडी बाजारचे प्रवर्तक नरेंद्र पवार हे सदस्य आहेत. तर पणन संचालक शरद जरे सदस्य सचिव आहेत.

# केंद्राच्या ई-नाम योजनेत नवीन ३० बाजार समित्या

## पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत शिक्कामोर्तब

- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती

**पुढारी वॉच**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

केंद्र सरकारच्या ई-नाम योजनेमध्ये राज्यात नव्याने ३० कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश करण्यावर राज्य कृषि पणन मंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यामुळे यापुर्वीच्या १३३ आणि नवीन ३० मिळून शेतमालाच्या ऑनलाईन व्यापारात समाविष्ट ई-नाममधील बाजार समित्यांची एकूण संख्या आता १६३ होत असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.




पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली पणन मंडळाच्या संचालक मंडळाची गेल्याच आठवड्यात मार्केट यार्डातील मुख्यालयात बैठक झाली. त्यामध्ये नव्याने तीस बाजार समित्यांमध्ये ई-नामची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

### नाशिक बाजार समितीचे विभाजन

नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या विभाजनावर पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यातून त्रिंबकेश्वर आणि पेठ तालुक्यासाठी दोन स्वतंत्र बाजार समित्यांचा समावेश आहे. नाशिक जिल्हा उपनिबंधकांनी याबाबत पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कृषि पणन मंडळ अधिकारी व कर्मचारी कल्याणकारी निवृत्ती सन्मान योजना लागू करण्यावरही बैठकीत चर्चा झाली. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव देण्याच्या सूचनाही पणन मंत्र्यांनी बैठकीत दिल्याची माहिती मंडळातील अधिकाऱ्यांकडून मिळाली.

त्यामध्ये वार्षिक सुमारे पाच हजार मेट्रिक टनाचेवर शेतमालाची आवक असलेल्या देऊळगांव राजा, जळगांव जामोद, पुसद, वरुड, सातारा, तासगांव, अहमदपूर, औराद शहाजनी, केज, ब्रम्हपुरी, चिमूर, कळमेश्वर, मांढळ, पुलगांव, जामखेड, कळवण, कर्जत (अहिल्यानगर), पाचोरा, पारोळा, श्रीगोंदा, यावल या अ वर्गातील २१ बाजार समित्यांचा समावेश आहे.

तसेच बाळापूर, लोहा, हिंगणा, आष्टी (वर्धा), साक्री, भुसावळ, अक्कलकोट या ब वर्गातील ७ बाजार समित्या आहेत. तसेच पाटोदा व निलंगा या क वर्गातील २ बाजार समित्या आहेत. तसेच ई-नाम योजनेनुसार प्रति बाजार समिती संगणक सामुग्री, अन्य उपकरणे, वायफाय व इंटरनेटसह अन्य सुविधांसाठी ३० लाख रुपये याप्रमाणे सुमारे नऊ कोटींइतका निधी कृषि पणन मंडळास उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला पाठविला असल्याचेही कदम यांनी स्पष्ट केले.

Agrowon, 06/06/2026

# बाजार समित्यांना डिजिटल करण्यासाठी भर द्या : रावल

## राज्य कृषी पणन मंडळाच्या आढावा बैठकीत निर्देश

ॲग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : जागतिक विपणन व्यवस्था वेगाने डिजिटल होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना डिजिटल करण्यावर भर देण्यात यावा. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाला काढणीनंतरचे नुकसान टाळण्यासाठी अत्याधुनिक शीतगृह उभारून साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी जागतिक दर्जाची सल्लागार संस्था नेमण्यात यावी, अशा सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या

राज्य कृषी पणन मंडळाच्या आढावा बैठकीत गुरुवारी (ता. ५) ते बोलत होते. या वेळी मंडळाचे संचालक आमदार चरणसिंग ठाकूर, पणन मंडळाचे संचालक नारायण पाटील, संचालक तुळशीदास रावराणे, पणन उपसचिव विजय लहाने, पणन संचालक शरद जरे, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते.

### प्रकल्प सल्ला कक्ष स्थापन

राज्यातील बाजार समित्या, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, निर्यातदार आणि खासगी उद्योजकांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांबाबत उच्च दर्जाची सल्ला सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने 'प्रकल्प सल्ला कक्ष' स्थापन केला आहे. यासाठी अनुभवी सल्लागार संस्था व वैयक्तिक सल्लागारांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे.

### आंबासह संत्रा आणि पेरू महोत्सवाचे आयोजन

आंबा, संत्रा, पेरू अशा विविध पिकांचे एकत्रित महोत्सव आयोजित करण्यात यावेत. फळ महोत्सवांचे सातत्य राखून त्यांच्या ब्रँडिंगवर भर द्यावा. प्रत्येक निर्यात सुविधा केंद्रांचा आढावा घेऊन ती पूर्ण क्षमतेने चालविण्यावर भर द्यावा, अशा सूचना रावल यांनी केल्या.

Sakal, 05/06/2026

# राज्यातील बाजार समित्या होणार डिजिटल

## पणनमंत्री जयकुमार रावल यांचे निर्देश; शीतगृहांचीही क्षमता वाढवणार

**मार्केट यार्ड, ता. ४ : "राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या डिजिटल करण्यासाठी ठोस नियोजन करावे, शेतमालाचे काढणीनंतरचे नुकसान टाळण्यासाठी तंत्रज्ञानयुक्त शीतगृहांची साठवणूक क्षमता वाढविण्यावर भर द्यावा," असे निर्देश पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुण्यात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.**



जयकुमार रावल

रावल म्हणाले, "राज्याची कृषी विपणन व्यवस्था अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी डिजिटल प्रणालीचा व्यापक वापर आवश्यक आहे. यासाठी निश्चित कालमर्यादेत नियोजन करून प्रलंबित प्रकल्प पूर्ण करावेत. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) अधिक सक्षम करण्यासाठी प्रक्रिया उद्योगांमध्ये त्यांचा सहभाग वाढवावा, तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये एफपीओ नाहीत, तेथे नव्या संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन द्यावे. आंबा, संत्रा, पेरू आदी फळांचे महोत्सव सातत्याने आयोजित करून त्यांच्या ब्रँडिंगवर भर द्यावा. निर्यात सुविधा केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत करण्याबरोबरच काजू उद्योगासाठी प्रक्रिया ते विपणनापर्यंतची संपूर्ण साखळी विकसित करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी राज्यातील बाजार समित्या, सहकारी संस्था, एफपीओ, निर्यातदार आणि उद्योजकांना मार्गदर्शनासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'प्रकल्प सल्ला कक्षा'चा आढावा घेण्यात आला. तसेच, संत्रा मूल्यवर्धनासाठी पाच नवीन संत्रा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता देण्यात आल्याची माहितीही दिली. बैठकीत किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत खरेदी, सुविधा केंद्रे, स्मार्ट प्रकल्प आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन यांसह विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

# राष्ट्रीय बाजारामुळे शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर : जयकुमार रावल

**मार्केट यार्ड :** केंद्र आणि राज्य सरकारच्या शेतकरी हिताच्या धोरणानुसार मुंबई आणि नागपूर बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजाराचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा, विस्तारित बाजारपेठ आणि शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळण्यास मदत होणार असल्याची माहिती राज्याचे पणनमंत्री तथा मुंबई राष्ट्रीय बाजाराचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली.

राज्य कृषी पणन मंडळातील बैठका पार पडल्यानंतर गुरुवारी (ता. ४) पत्रकारांशी संवाद साधताना रावल यांनी ही माहिती दिली. रावल म्हणाले, "मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभाराबाबत गेल्या काही वर्षांत आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहारांच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे."

## वापर कराबाबत चर्चा करू

**■ पुण्यासह मुंबई बाजार समितीमध्ये अनियमित शेतमालावर वापर कर लावण्यात आला आहे. या माध्यमातून बाजार समित्यांना उत्पन्न मिळणार आहे. याचा उपयोग शेतकरी, व्यापारी आणि बाजार घटकांना सोयी-सुविधा देण्यासाठी होणार आहे. मात्र याला विरोध करणे चुकीचे आहे. कर किती द्यायचा यावर चर्चा होऊ शकते. मात्र कर देणारच नाही, बाजार बंद करू अशी भूमिका व्यापाऱ्यांनी घेणे योग्य नसल्याचे पणनमंत्री रावल म्हणाले.**

Pudhari, 05/06/2026

# कृषी उत्पन्न बाजार समित्या डिजिटल करण्यासाठी नियोजन करा

## ▌पणनमंत्री रावल यांच्या सूचना ▌अत्याधुनिक शीतगृह उभारून साठवणूक क्षमता वाढवा



**पणन मंडळाच्या बैठकीत बोलताना पणनमंत्री रावल व उपस्थित मान्यवर.**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक विपणन व्यवस्था वेगाने डिजिटल होत असून, त्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना डिजिटल करण्यावर भर देण्यात यावा. तसेच, शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या काढणीपश्चात होणारे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी राज्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त शीतगृह उभारून साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी वेळेत नियोजन करावे. त्यासाठी जागतिक दर्जाची सल्लागार संस्था नेमण्याची सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मार्केट यार्डातील मुख्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. ४) संचालक मंडळाची बैठक झाली. त्यावेळी त्यांनी या सूचना केलेल्या आहेत. बैठकीस संचालक आमदार चरणसिंग ठाकूर, नारायण पाटील, तुळशीदास रावराणे, पणन उप सचिव विजय लहाने, पणन संचालक शरद जरे, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पणनमंत्री जयकुमार रावल म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याची तीन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. डिजिटल बाजार व्यवस्थेत कृषी पणन तज्ज्ञ, माहिती विश्लेषक, प्रक्रिया तज्ज्ञ आणि माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञांचा समावेश करावा. त्याचा मोठा फायदा शेतकऱ्यांच्या शेतमालाला देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी होईल. विभागीय अधिकाऱ्यांनी कृषी पणन मंडळांतर्गत सुरू असलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत. शेतमाल काढणीपश्चात होणाऱ्या मालाच्या नासाडीमध्ये देशात सव्वा ते दीड लाख कोटी रुपयांचे नुकसान होते. त्यात एकट्या महाराष्ट्राचा वाटा १२ ते १५ हजार कोटी रुपयांचा आहे. त्यामुळे शीतगृह साठवणूक महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले.

## पालघरमधील दापचरीत उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने दापचरी (ता. डहाणू, जि. पालघर) येथे सुमारे १३०० एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराची उभारणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. या प्रकल्पास शासनाने मान्यता दिली असून, जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू आहे. या बाजारासाठी जल, रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतुकीस सुयोग्य अशी जागा मिळाल्यामुळे शेतमाल निर्यातीची मोठी संधी राज्याला उपलब्ध झाल्याची माहिती राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

राज्य कृषी पणन मंडळाच्या मार्केट यार्डातील मुख्यालयात गुरुवारी (दि.४) झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

### युझर चार्जेसबाबत मध्यस्थीचा मार्ग काढू : पणनमंत्री

कृषी उत्पन्न बाजार समिती ही सर्व्हिस इंडस्ट्री आहे. सरकार समितीला अनुदान, पगार देत नाही. ते स्वतः स्वावलंबी झाले पाहिजेत. सर्व्हिस चार्ज ही मार्केट कमिट्यांनी लागू केले आहेत. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील युझर चार्जेसला व्यापाऱ्यांनी आक्षेप घेतले आहेत. व्यापारी नाराज होणार नाहीत, मार्केट बंद होणार नाही, असा मध्यस्थीचा मार्ग काढू, असेही रावल म्हणाले.

### बैठकीतील काही महत्त्वपूर्ण निर्णय

- संत्रा फळाचे मूल्यवर्धन करण्यासाठी पाच संत्रा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता दिली आहे.
- मंडळाने विविध फळ महोत्सवांचे सातत्य राखून त्यांच्या ब्रँडिंगवर भर द्यावा.
- शेतकरी उत्पादक संस्थांचा प्रक्रिया उद्योगातील सहभाग वाढवावा व नवीन संस्था स्थापन करा.
- राज्यातील खासगी बाजाराचे व्यवहार सुनिश्चित कालावधीत ऑनलाइन करण्यासाठी पणन संचालकांना सूचना दिल्या आहेत.
- बाजार समित्या, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, निर्यातदार आणि खासगी उद्योजकांना शासन योजनांच्या माहितीसाठी पणन मंडळ 'प्रकल्प सल्ला कक्ष' स्थापन केला.
- त्यासाठी अनुभवी सल्लागार संस्था व वैयक्तिक सल्लागारांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे.

# पणनमंत्रीच असणार राष्ट्रीय बाजाराचे अध्यक्ष

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात स्थापन होणाऱ्या 'राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारां'वर थेट राज्य सरकारचा अंकुश राहणार असून, यापुढे राज्याचे पणनमंत्री हे अशा बाजार समितीचे अध्यक्ष, तर पणन राज्यमंत्री हे उपाध्यक्ष म्हणून कामकाज पाहतील. याबाबतचा आदेश बुधवारी जारी झाला आहे. दरम्यान, या माध्यमातून शेतकरी आणि व्यापाऱ्यांना नव्या संधींची दारे उघडली जाणार आहेत.

कृषी व्यापाराला राष्ट्रीयस्तरावरील व्यासपीठ, आंतरराज्य व्यापाराला चालना आणि बाजार व्यवस्थेत पारदर्शकता आणणे हे या निर्णयामागील मुख्य उद्देश आहेत.

नवीन तरतुदीनुसार, ज्या कृषी बाजारांमध्ये वार्षिक ८० हजार मेट्रिक टनांपेक्षा अधिक कृषी उत्पन्नाची उलाढाल आणि दोन किंवा त्यापेक्षा अधिक राज्यांमधून मालाची आवक असणाऱ्या बाजारांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' म्हणून घोषित करण्यात येणार आहे.

या अध्यादेशातील सर्वात महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय म्हणजे 'एककृत एकल व्यापार परवाना' प्रणालीची अंमलबजावणी आहे. या व्यवस्थेमुळे व्यापाऱ्यांना आता प्रत्येक बाजार समितीसाठी स्वतंत्र परवाना घेण्याची गरज राहणार नाही.

सकाळ ॲग्रोवन
गुरुवार, ४ जून २०२६


# नागपूर बाजार समितीला राष्ट्रीय बाजाराचा दर्जा

## अधिसूचना प्रसिद्ध; संचालक मंडळ बरखास्त

ॲग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : कृषी उत्पन्न बाजार समितीला (एपीएमसी) राष्ट्रीय बाजाराचा दर्जा देत तिचे 'नागपूर मार्केटप्लेस फॉर नॅशनल इम्पोर्टन्स' (एमएफएनआय) मध्ये रूपांतर करण्यात आले आहे. राज्य सरकारने या संदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली असून विद्यमान संचालक मंडळ तत्काळ बरखास्त झाले आहे. देशातील ११ राज्यांतील शेतीमालाची आवक असलेल्या नागपूर बाजाराला या निर्णयामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नवे दालन खुले होणार असल्याचा दावा राज्य सरकारने केला आहे.

राज्यातील पारंपरिक बाजार समिती व्यवस्थेपेक्षा वेगळ्या स्वरूपात हा बाजार कार्यरत राहणार असून त्याची सूत्रे थेट पणन विभागाकडे असतील. नागपूरच्या कळमना येथील बाजारात दरवर्षी सुमारे चार लाख टन शेतीमालाची उलाढाल होते. मध्य प्रदेश, छत्तीसगड, तमिळनाडू, केरळ, कर्नाटकसह ११ राज्यांमधून येथे विविध शेतीमालाची आवक होते. कापूस, सोयाबीन, संत्री, तृणधान्ये आणि भाजीपाला यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री येथे केली जाते. उपलब्ध माहितीनुसार, २०२४-२५ मध्ये सुमारे ६२ कोटी रुपयांचा महसूल या बाजार समितीला प्राप्त झाला.

दरम्यान राष्ट्रीय बाजार घोषित होताच बाजार समितीमध्ये चार कोटी रुपये किमतीचे प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प उभारणीच्या प्रस्तावाला शासनाने तडकाफडकी मान्यता दिली. २०२६-२७ या आर्थिक वर्षात हे काम पूर्ण करण्याची अट आहे.

### नवी प्रशासकीय रचना

नवीन व्यवस्थेनुसार अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदी अनुक्रमे पणनमंत्री व पणन राज्यमंत्री राहतील. कृषी व पणन विभागातील वरिष्ठ अधिकारी, व्यापारी, तज्ज्ञ आणि शेतकरी प्रतिनिधींचा समावेश असलेली नवी रचना तयार करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी स्थानिक व परराज्यातील मिळून सात शेतकरी, तीन व्यापारी आणि एक तज्ज्ञ सदस्य नियुक्त करण्यात येणार आहेत. मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याकडे समितीचे प्रशासन राहील.

Sakal, 03/06/2026

# 'एपीएमसी' आजपासून राष्ट्रीय बाजार समिती

## अध्यक्षपदी पणनमंत्री जयकुमार रावल

**नवी मुंबई, ता. २ :** नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे (एपीएमसी) संचालक मंडळ अधिकृतपणे बरखास्त करण्यात आले असून, या बाजार समितीचे रूपांतर आता एका व्यापक 'राष्ट्रीय बाजार समिती'मध्ये झाले आहे.

या पुनर्रचित राष्ट्रीय बाजार समितीच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांची अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यांनी आज नवी मुंबईतील वाशी येथील एपीएमसी मुख्य कार्यालयात कार्यभार स्वीकारला. या प्रशासकीय परिवर्तन अंमलबजावणीसाठी पणन संचालक विकास रसाळ यांनी तात्पुरते प्रशासक म्हणून यापूर्वीच कारभार हाती घेतला होता.

Agrowon, 03/06/2026

# भोर बाजार समिती करणार भाताचे ब्रँडिंग

**भोर, जि.पुणे :** पश्चिम डोंगरी भागासाठी प्रसिद्ध असलेल्या आणि भात, बांबूचे आगार असलेल्या भारे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने भाताचे ब्रँडिंग आणि बांबूचा घाऊक बाजार सुरू केला जाणार असल्याची माहिती सभापती सुरेश राजीवडे व उपसभापती प्रवीण शिंदे यांनी दिली.

पत्रकार परिषदेत समितीमार्फत शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या उपक्रमांची व योजनांची माहिती दिली. या वेळी बाजार समितीचे माजी सभापती अंकुश खंडाळे, सचिव चंद्रकांत तांदळे, संचालक राजाराम तुपे, विनोद खुटवड, राजेंद्र शेटे व संचालिका अनिता गावडे उपस्थित होत्या.

बाजार समितीचे मुख्य कार्यालय भोर



शहरात असून नसरापूर येथे अडीच एकारात आणि किकवी येथे ४ एकरांमध्ये उपबाजार सुरू आहेत. १९६५ मध्ये सुरू झालेल्या भोर बाजार समितीचे भोरमध्ये फक्त कार्यालय आहे. भोरमध्येही बाजारपेठ सुरू व्हावी यासाठी सोयाबीन खरेदी केंद्र आणि शेतकऱ्यांकडून भात खरेदी करून त्याचे ब्रँडिंग करण्यात येणार आहे. याशिवाय बांबूचा होलसेल बाजार सुरू करण्यात येणार आहे. म्हणून २७ गाळ्यांचा प्रस्ताव पणन मंडळाकडे परवानगीसाठी पाठविला असल्याचे सुरेश राजीवडे यांनी सांगितले.

१९९५-९६ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन मंडळाकडून घेतलेल्या ३१ लाख रुपयांच्या कर्जाशिवाय शासनाकडून कोणतेही अनुदान व सदत मिळालेली नाही. तरीही समितीने नसरापूर येथे स्वतःच्या अडीच एकर जागेत ४५ नवीन गाळे बांधले आहेत. किकवी येथे चार एकरांच्या जागेत जनावरांच्या बाजार सुरू केला आहे. सद्यःस्थितीत बाजार समितीकडे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता आहे. नसरापूर येथे २४ तास कर्मचारी कार्यरत आहेत. माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचा वाटचाल सुरू असल्याचे सभापती सुरेश राजीवडे यांनी सांगितले.

Agrowon, 03/06/2026

# मुंबई बाजार समिती अखेर राष्ट्रीय बाजार म्हणून घोषित

## अध्यक्षपदी पणनमंत्री जयकुमार रावल

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील शेतीमालाच्या विक्री व्यवस्थेत पारदर्शीपणा आणण्यासाठी २०१७ च्या मॉडेल ॲक्टची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या कायद्यानुसार मुंबई बाजार समितीला राष्ट्रीय बाजार म्हणून घोषित करण्यात आले आहे. नव्या कायद्यानुसार पणनमंत्री जयकुमार रावल आता बाजार समितीचे अध्यक्ष असणार असून, त्यांनी मंगळवारी (ता. २) पदभार स्वीकारला.

शेतीमाल विक्री व्यवस्थेतील महत्त्वाची संस्था असलेल्या बाजार समित्यांमधील शेतकऱ्यांची होणारी लूट रोखण्यासाठी विविध धोरणात्मक सुधारणा करण्याचे केंद्र सरकारकडून प्रयत्न सुरू होते.

पान ४ वर »

» पान १ वरून

यासाठी केंद्र सरकारने २०१७ च्या पणन सुधारणांचा मसुदा राज्य सरकारला पाठविला होता. मात्र सत्ता बदलामुळे नवीन पणन कायद्याला खिळ बसली होती. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत हा कायदा मंजूर करून घेतला.

या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली असून, मुंबई बाजार समितीला राष्ट्रीय दर्जा देण्याबाबतचे राजपत्र २९ मे रोजी प्रसिद्ध झाले. मात्र सलग दोन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे याची अंमलबजावणी होऊ शकली नव्हती. मंगळवारी (ता. २) पणनमंत्री रावल यांनी बाजार समितीच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. या वेळी पणन संचालक आणि बाजार समितीचे सचिव शरद जरे उपस्थित होते.

> राज्य सरकार शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून काम करत आहे. शेतकऱ्यांना अधिक समृद्ध करण्यासाठी पणन व्यवस्था सक्षम करणे गरजेचे आहे. बांधापासून ते बाजारपेठेपर्यंतची मूल्यसाखळी मजबूत करणे गरजेचे आहे. यामध्ये शीतगृहे, गोदामे, कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि निर्यात व्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे. यासाठी महत्त्वाच्या राष्ट्रीय बाजारपेठा विकसित करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यासाठी हा पहिला प्रयत्न आहे. भविष्यात सुमारे १ हजार एकरांवर जगातील सर्वात मोठी कृषी बाजारपेठ महाराष्ट्रात उभारण्याचा संकल्प असून, महाराष्ट्रातील शेतीमाल जागतिक बाजारपेठेत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.
>
> - **जयकुमार रावल,** पणन मंत्री, तथा अध्यक्ष मुंबई राष्ट्रीय बाजार समिती